Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

Original Article

# डॉ.सदानंद दाते (आयपीएस) यांचे ' वर्दीतील माणसाच्या नोंदी ' मधील व्यक्त होणारे समाज दर्शन

**धीरजकुमार रामदास नंदागवळी[1], डॉ. प्रवीण बी काळे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, रासंतुमवि, नागपूर
[2]मार्गदर्शक, प्राध्यापक मराठी विभाग, कला वाणिज्य महाविद्यालय आर्वी जिल्हा वर्धा
**Email:** nandagawalidhirajkumar@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170938
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9
Pp. 207-212
September 2025
**Submitted:** 21 Aug. 2025
**Revised:** 1 Sept. 2025
**Accepted:** 20 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***सारांश***

*डॉ. सदानंद दाते (आयपीएस) यांच्या 'वर्दीतील माणसाच्या नोंदी' या स्वकथनावर आधारित हा लेख त्यांच्या पोलिसी सेवेतून समाजदर्शन उलगडतो. त्यांच्या तिन्ही दशकांच्या सेवेत त्यांनी अनुभवलेल्या संघर्ष, प्रामाणिकपणा, नैतिकता, राजकीय दबाव आणि सामाजिक वास्तवाचे जिवंत चित्र या लेखात दिसते. चिपळूण, वर्धा, भंडारा, साकोली, अमरावती, मुंबई या ठिकाणी कार्यरत असताना त्यांनी कायदा-सुव्यवस्था राखताना समाजातील विषमता, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता, झोपडपट्टीतील जीवन आणि दारूबंदी यांचा अभ्यास केला. त्यांनी पोलिस दलात नैतिकता, जनसेवा आणि व्यसनमुक्तीची भावना रुजवली. त्यांच्या लेखनातून वर्दीमागे असलेला संवेदनशील, मानवी चेहरा आणि समाजाशी निगडित जबाबदारी प्रकट होते.*

***मुख्यशब्द:*** *डॉ. सदानंद दाते, वर्दीतील माणसाच्या नोंदी, समाजदर्शन, पोलिस सेवा, नैतिकता, प्रामाणिकपणा, व्यसनमुक्ती, वर्धा, भंडारा, झोपडपट्टी, राजकीय दबाव, जनसेवा.*

## प्रस्तावना

पोलीस विभागातील नोकरी हा एक वेगळाच अनुभव आहे. पोलिसांच्या कार्यक्षेत्रात समाजातल्या सर्व थरातले लोक येतात. धनाढय, सत्ताधीश, विचारवंत, प्रथितयश मंडळींच्या बरोबरीनेच गरीब, मागास आणि वंचित समूहांमध्ये पोलिसांचा वावर असतो. कधी कधी कायद्यांची अंमलबजावणी ' नाही रे ' वर्गाच्या विरुद्ध जाणारी असते; पण कायदा - सुव्यवस्था राखण्यासाठी ते करणं आवश्यक असतं. त्यामुळे मनाची कुतरओढ होते. कायद्यातील त्रुटी, पळवाटा आणि अपुरे पणामुळे फरफटही होते; पण नाही कुतरओढ व्यक्त करता येते, ना फरफट.

अर्थात पोलीस सेवेत मन प्रसन्न करणारे, व्यक्तिमत्व समृद्ध करणारे, जीवनाची सार्थकता पटवणारे, सारा आसमंत उजळवून टाकणारे निखळ समाधानाचे क्षणही येतात .कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांसाठी अनुभवांची ही शिदोरी मोठी उपयोगाची असते. त्यातून भविष्यात येणाऱ्या अनुभवांना अधिक कणखरपणे आणि सकारात्मक दृष्टीने सामोर जाण्यास मदत होते. या स्वकथनामध्ये तीस वर्षाच्या पोलीस सेवेत व्यक्ती म्हणून सदानंद दाते यांना समृद्ध करणाऱ्या अनुभवाबद्दल दाते यांनी लिहिलेल आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

**Address for correspondence:**
*धीरजकुमार रामदास नंदागवळी, संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, रासंतुमवि, नागपूर*

**How to cite this article:**
*नंदागवळी, . धीरजकुमार . रामदास ., & काळे, . प्रवीण . बी . (2025). डॉ.सदानंद दाते (आयपीएस) यांचे ' वर्दीतील माणसाच्या नोंदी ' मधील व्यक्त होणारे समाज दर्शन. Journal of Research and Development, 17(9), 207–212. https://doi.org/10.5281/zenodo.17473131*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17473131
OPEN ACCESS

यात त्या-त्या वेळची मनोभूमिका संघर्ष व्यथा तर आली आहेच; पण त्या भूमिकेतून त्यांनी भारतीय पोलीस सेवेत काही बदल झाला का? काही सुधारणा झाली का? हेही तपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे.त्याचबरोबर या सगळया अनुभवामागच्या देश- काल- परिस्थिती -सामाजिक पार्श्वभूमीचा आणि प्रशासन व्यवस्थेच्या मूलतत्त्वांचाही आढावा त्यांनी घेतला आहे. यामध्ये काही अनुभव आहेत. समाजाचे दर्शन आहे.

**जीवनपट**

डॉ. सदानंद दाते म्हणजे पोलीस अधिकाऱ्यांच्या नभांगणातला तारा आहे. आजवर अनेक सक्षम अधिकारी न्यायाची आणि सत्याची कास धरण्यात, कायद्याची यथायोग्य अंमलबजावणी करण्यात, कायद्यासमोर सर्वांना समान लेखण्यात कमी पडले आहेत, हे खेदाने कबूल करायला हवं . पण सुदैवाने आपल्याकडे असेही काही अधिकारी आहेत,ज्यांनी घटनेचा मान राखण्याची आपली शपथ तंतोतंत पाळलेली आहे. डॉ. सदानंद दाते अशा पोलीस अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. पोलीस खात्याच्या व्यवस्थापकीय पदावर अधिकाऱ्यांची थेट भरती करण्याची पद्धत ब्रिटिशांनी सुरू केली. कारण आपल्या देशात भ्रष्टाचार रुजलेला असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक न्यायापासून वंचित राहत असल्याचं त्यांचं मत होतं. त्यावर उपाय म्हणून त्यांनी थेट विद्यापीठांमधून सहाय्यक पोलीस अधीक्षक पदावरच्या नेमणुका करण्याचा आणि त्यांना इतर अधिकाऱ्याहून चांगले पगार देण्याचे ठरवलं. आय.पी. (इंपीरियल पोलीस) मध्ये भरती झालेल्या अशा अधिकाऱ्यांचे प्रमुख काम होतं,ते म्हणजे स्टेशन हाऊस ऑफिसर्स आणि इतर कनिष्ठांच्या तपास कामावर बारकाईने लक्ष ठेवून अपराधी पकडले जातील हे पाहणं आणि एकाही निरपराधाला हकनाक शिक्षा होणार नाही याची खातरजमा करण. स्वातंत्र्यानंतरही सहाय्यक पोलीस अधीक्षक पदावरच्या अशा थेट नेमणूक सुरू राहिल्या.

सुरुवातीच्या अशा अधिकाऱ्यांनी आपल्या पूर्वसुरींची परंपरा पुढे चालवली. त्याच वेळी, अशा अधिकाऱ्यांनी सत्याची कास सोडू नये आणि कायद्याने मिळालेल्या अमाप सत्तेचा गैरवापर करू नये .याकडे राजकारणी जातीने लक्ष ठेवून होते. आता इतक्या वर्षांनी परिस्थिती खूपच पालटली आहे. भारतातल्या राजकारणाने वेगळं वळण घेतलं आहे.

पोलिसांनी कायद्याला बगल देऊन सत्यापेक्षा राजकारण्यांच्या इच्छानुसार चालावं यासाठी सत्तेचा वारंवार वापर करून पोलिसांना आमिष दाखविली जातात.यामुळे गुन्हेपीडीतांवर अपार अन्याय होतो. त्याचवेळी गुन्हेगारांनाही बळ मिळतं.पोलीस अधिकाऱ्यांच्या नेमणुका आणि बदल्या करणाऱ्या राजकारण्यांचा वरदहस्त असेल तर आपल्याला कुणी हात लावू शकत नाही असं त्यांना वाटू लागतं.डॉ. सदानंद दाते यांनी राजकीय दबावाच्या अशा अनेक अंधाऱ्या गल्ल्या पार केल्या आहेत. त्यामुळेच त्यांना जनतेचं प्रेम मिळालं. त्यांनी सत्तेची आणि न्यायाची कास अजिबात न सोडल्यामुळेच त्यांना हे शक्य झालं.आपल्या कामाचा गौरव व्हावा अशी त्यांनी कधीच अपेक्षा ठेवली नाही, आणि तेच त्यांच्या यशाचं गमक आहे.

त्यांनी आपल्या `वर्दीतील माणसाच्या नोंदी` या स्वकथनात त्यांनी पोलीस ट्रेनिंग अकॅडमी मधल्या सुरुवातीच्या दिवसाबद्दल आपले स्वकथन लिहिलेले आहेत. त्यांना डीआयजी रामकृष्णन यांच्याकडून खूप काही शिकायला मिळालं. त्यानंतर प्रत्येक जबाबदारी पार पाडताना त्यांनी हाताखालच्या लोकांकडूनही शिकत राहणं कधीही सोडलं नाही. त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी रत्नागिरीला पाठवण्यात आलं. तत्कालीन अधीक्षकांनी त्यांना आपल्या कार्यालयाबाहेर दोन तास ताटकळायला लावून मगच त्यांची भेट घेतली. एका तरुण सहाय्यक अधीक्षकाला प्रशिक्षणासाठी खातेनिहाय बढती मिळालेल्या अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आल्याचं आश्चर्यच वाटत होतं.

वर्धा जिल्ह्याशी महात्मा गांधीचे नाव अगदी जवळून जोडलं गेलेलं असल्याने त्या जिल्ह्यात संपूर्ण दारूबंदी घोषित झालेली होती. असं असूनही तिथे दारूची सर्रास विक्री चालायची हे डॉ.सदानंद दातेंनी पाहिलं. तसंच त्यांच्याकडे येणाऱ्या सर्वाधिक तक्रारी अवैध्य दारूविक्री करणाऱ्यांच्या विरोधातल्याच असायच्या. त्यांनी अवैध्य दारूच्या विरोधात मोहीम उघडली आणि अवैध दारू व्यवसायाशी लागेबांधे असणाऱ्या राजकारण्यांची आणि पोलीस अधिकाऱ्यांची नाराजी ओढवून घेतली. परिणामी, त्यांची लोकप्रियता घटली. मात्र त्यामुळे ते नाव उमेद झाले नाहीत. भंडाऱ्यात त्यांना एका मंत्री महोदयांनी आपल्या मर्जीतल्या उमेदवारांची भरती करण्यास सांगितलं. त्याला त्यांनी नकार दिल्यावर मंत्र्यांनी त्यांना योग्य वाटेल ते करण्याची मुभा देण्याइतपत सौजन्य तर दाखवलं; मात्र, त्या उमेदवारांसमोर आपली शिफारस पत्र टारकावू नयेत अशी विनंतीही केली ! पोलीस भरती म्हणजे भ्रष्टाचाराचा एक मोठं कुरण बनलेल आहे आणि ही बाब चीड आणणारी आहे, प्रामाणिकपणे केली जाणारी भरती, संबंधित भरती अधिकाऱ्यांच्या लौकिकात तर भर घालतेच, शिवाय त्यामुळे पोलीस दलांचं सामर्थ्यही वाढीस लागत. चांगल्या अधिकाऱ्यांकडून धडे घेण्यास दाते नेहमीच तयार असत. सूर्यकांत जोग आणि संजीव दयाल यांचा ते उल्लेख करतात. पोलीस स्टेशनची परिणामकारक पाहणी कशी करावी, तसंच कठीण परिस्थितीतही शांत कसं राहावं हे त्यांच्याकडून शिकल्याचं त्यांनी लिहिलं आहे. सन २००५ साली डॉ. सदानंद दाते फुलब्राईट शिष्यवृत्तीवर एक वर्षासाठी अमेरिकेला गेले. तिथल्या सर्वसामान्य माणसाचे त्यांनी लिहिलेले अनुभव वाचण्यासारखे आहेत. एका विना तिकीट प्रवासाला तिकीट तपासणीसाने पकडलं. त्या प्रवासाचं ओळखपत्र जप्त केलं गेलं. तिकिटाची आणि दंडांची रक्कम भरून कार्यालयातून ओळखपत्र घेऊन जाता येईल असं त्यांना सांगण्यात आलं. आपल्याकडे जसं चित्र दिसलं असतं त्याच्याबरोबर उलट तिथे त्या गोष्टीचा जराही कांगावा केला गेला नाही.

डॉ. सदानंद दाते यांनी आपल्या आपल्याला मिळालेली कोणतीही नेमणूक स्वीकारण्यास कधीही का-कू केली नाही. तीच त्यांची ताकद आहे. आपलं सामान बांधून ते सदैव तयार असतात. राजकारणांद्वारे सरळ मार्गी अधिकाऱ्यांच्या डोक्यावर सतत बदलीची

टांगती तलवार ठेवली जाते. परंतु दातेंना त्याचं कधीही भय वाटलं नाही. त्यामुळेच ते चुकीच्या गोष्टींना नकार देऊ शकले आणि निर्भीडपणे स्वतंत्र बाण्याने काम करू शकले. संपूर्ण चमुला पुढे घेऊन जाणारं उत्तम नेतृत्व, चांगल्या कामाचं श्रेय कनिष्ठांनाही देण्याची वृत्ती, आदिंबद्दलची त्यांची मतं आवर्जून वाचण्याजोगी आहेत. पोलीस खात्यामध्ये तरुण उमेदवार तसेच त्यांचे वरिष्ठ या सर्वांनीच त्यांचं हे स्वकथन वाचायला हवं. देशभरातल्या सर्व पोलीस दलामधील तरुण पोलिस अधिकाऱ्यांनी हे लक्षात घ्यायला हवं की ,जनतेचे लक्ष वेधून घेण्यासाठी कोणतीही हिरोगिरी करण्याची ना आवश्यकता असते ना तसं करणं श्रेयस्कर ठरतं. उलट नैतिकता, सचोटी बाळगणं, न्याय आणि योग्य कृती करणं हेच महत्त्वाचं ठरतं. असं केल्याने जनता त्यांना कायम आपलं मानून लक्षात ठेवेल आणि त्यांना कामातून पुरेपूर समाधान मिळेल.

ऑक्टोंबर 1993 मध्ये सदानंद दाते यांना सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून कोकणातील चिपळूणला पहिलं पोस्टिंग मिळालं. आयपीएसचं प्रशिक्षण उत्तम प्रकारे पूर्ण केल्यामुळे त्यांच्या मनात आत्मविश्वास होता. प्रशिक्षणात घेतलेले धडे ताजे होते. पोलीस सेवेत चांगली कामगिरी करून दाखवण्याची त्यांची उर्मी होती आणि सेवेतला पहिला दिवस कसा असेल याविषयी उत्सुकताही होती. दाते रत्नागिरीला पोहोचले. पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन नंतर चिपळूणला जाऊन काम सुरू करायचं त्यांनी ठरवलं होतं. पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयात जाऊन आपण आल्याचं त्यांना कळवलं. नोकरीच्या पहिल्या दिवशी उत्साहाने सळसळणारा तरुण आणि निवृत्तीकडे झुकलेले वरिष्ठ अधिकारी अशी ती भेट होणार होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केबिनमध्ये बोलवण्याची ते वाट पाहत होते; पण पुढचे दोन तास त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदानंद दाते यांना आत बोलवलंच नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयात, कार्यालयातले कनिष्ठ अधिकारी, कारकून, शिपाई असे सगळे त्यांच्या केबिनमध्ये ये - जा करत होते ते दाते आयपीएस दर्जाचे अधिकारी असूनही बाहेर उभे होते. शेवटी एकदा त्यांनी डॉ. सदानंद दाते यांना बोलवले. त्यांनी त्यांचा परिचय करून दिला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना बसायला सांगितलं नाही. त्यामुळे ते उभेच राहिले. नोकरीचा त्यांचा पहिला दिवस असल्यामुळे ते पोलीस सेवेत आणि या जिल्ह्यात त्यांचे स्वागत करतील, सुरुवातीचं काही औपचारिक बोलणं ,मार्गदर्शन ,गप्पा वगैरे होतील अशी त्यांची अपेक्षा होती; पण ती अपेक्षा त्यांची फोल ठरली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना थेट भाषणच द्यायला सुरुवात केली. " तुम्ही, नव्याने आलेले तरुण आयपीएस अधिकारी, तुमचा नेमका प्रॉब्लेम काय आहे ? हेच मला समजत नाही, मुळात तुम्हाला पोलीसींग समजत नाही. तुमच्यासाठी दारू आणि जुगाराच्या केसेस सर्वाधिक महत्त्वाच्या असतात. तिथे छापे घालण्यात तुम्ही धन्यता मानता. दरोडे, चोऱ्या, घर फोड्या, खून अशा गंभीर गुन्हयाकडे तुम्ही कानाडोळा करता. अर्थात इतरत्र तुम्ही काय करायचं, हा तुमचा प्रश्न आहे; पण आज तुम्ही माझ्या जिल्ह्यात रुजू होत आहे. इथे असं केलेलं मला अजिबात चालणार नाही. "

त्याच दिवशी संध्याकाळी डॉ. सदानंद दाते चिपळूणला पोहोचले कामाच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांच्या कार्यालयाच्या दारात लोकांची रीघ लागू लागली. त्यांच्या तक्रारी अनेक प्रकारच्या होत्या आणि खरोखरच त्यातले सर्वाधिक तक्रार या जुगार, सट्टा आणि बेकायदा दारू अ ड्याबद्दल होते. अर्थातच त्यांना त्याकडे दुर्लक्ष करणं शक्य नव्हतं. त्यांच्या हाताखाली सर्कल इन्स्पेक्टर होते आणि त्यांच्या हाताखाली आठ पोलीस स्टेशनचे अधिकारी होते. त्यांना दाते यांनी दारू आणि जुगारा च्या धंद्यावर छापे टाकून कारवाई करण्याचे आदेश दिले; पण लवकरच त्यांच्या लक्षात आलं की, त्यांच्या हाताखालचे लोक त्यांचं ऐकायला तयार नव्हती. आदेशाचे काटेकरुन पालन वगैरे दूरच; पण त्यांच्या आदेशाची दखल घ्यायचीही त्यांची तयारी नव्हती. एकतर ते छापे टाकायचे नाही. किंवा अशा प्रकारचे टाकायचे की, ते यशस्वी होणार नाही.

**डॉ. सदानंद दाते (आयपीएस) यांचे ' वर्दीतील माणसाच्या नोंदी ' मधील व्यक्त होणारे समाज दर्शन**

**वर्धा दारूबंदी जिल्हा :-**

वर्धा ही महात्मा गांधींची कर्मभूमी. त्यामुळे शासनाने जिल्ह्यामध्ये दारूबंदी जाहीर केलेली होती. एक संपूर्ण जिल्हा दारूमुक्त ठेवणे ही तशी सोपी बाब नाही. शिवाय दहा लाख लोकसंख्येला एक हजाराचं पोलीस दल कसं पुरे पडणार हा ही प्रश्न होताच; पण ते एकदाच मिशन हाती घ्यावं तसे दाते कामाला लागले. ते रोज १६ ते १८ तास काम करायचे. जिल्ह्याच्या सीमेपलीकडून मोठ्या प्रमाणावर दारूची दुकाने होती. नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर आणि अमरावतीच्या हद्दीतून आणलेली दारू वर्ध्यात चोरून विकली जायची. त्याकाळी इंग्लिश दारूची एक कॉटर २२ रुपयांना मिळायची दाते रुजू झाले.

तेव्हा तिथल्या काळ्या बाजारात त्याच बाटलीची किंमत ३५ रुपये होती. सदानंद दाते यांनी कठोर पावले उचलू लागल्यावर ही किंमत आणखी वाढू लागली. त्यांनी कठोर पाऊले उचलावे किंमत आणखीही वाढू लागली म्हणजे ते काम चोक करत होते; पण त्याचे परिणाम मात्र अनपेक्षित होते . दारूचा चोरटा व्यापार करणाऱ्या एका मुलाला त्यांनी पकडले.

**मगरडोह**

सदानंद दाते यांनी मगरडोह साकोली नंतर पदोन्नतीवर काही काळांसाठी अमरावतीला अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून काम केले. १९९६ च्या जानेवारी मध्ये भंडारा जिल्ह्याचा पोलीस अधीक्षक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यांनी त्या पदावर अडीच वर्ष काम केले. तो अगदी समाधानाचा काळ होता. नुकतेच रुजू झाले असतानाची गोष्ट अजून सर्व पोलीस ठाणे आणि दूरक्षेत्रांना त्यांच्या भेटीही झाल्या नव्हत्या. तेवढ्यात पोलीस उपमहानिरीक्षकांचा निरोप आला की, ते सर्व नक्षल विरोधी पोलीस ठाणे आणि दूरक्षेत्रांना भेटी देऊ इच्छितात. त्यावेळची मगरडोह सशस्त्र दूरक्षेत्राची भेट त्यांच्या विशेष स्मरणात राहिली आहे. ते पोलीस उपमहानिरीक्षकांसमवेत मगरडोला पोहोचले. तेथे तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या एका तुकडीची राहण्याची जागा त्यांनी पाहिली आणि तिथली अनावस्था तत्काळ लक्षात आली. ती तुकडी गावातील एका प्रतिष्ठित व्यक्तीच्या घरालगत पडवीच्या अर्ध्या भागात राहत होती. उरलेल्या अर्ध्या भागात जनावरांचा गोठा होता. स्वच्छता, सुरक्षा, किमान सुविधा या सगळयांचीच तिथे वाणवा दिसत होती. पोलीस

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

उपमहानिरीक्षक या दुरावस्थेबाबत नाराज होणे स्वाभाविक होते. त्यांनी एक काल मर्यादा आखून दिली आणि बजावलं की, मगरडोह सशस्त्र दूरक्षेत्राची अवस्था सुधारलीच पाहिजे. मगरडोह येथे थोड्या अंतरावर वापरात नसलेली शाळेची पडीक जुनी इमारत होती. जिल्हा परिषदेत रीतसर ठराव करून घेतला आणि त्या जागेवर राज्य राखीव पोलीस दलाच्या एका तुकडीची व सशस्त्र दूरक्षेत्राची ईमारत उभी केली.

**पोलीस वसाहत भंडारा**

अडीच वर्षात भंडाऱ्यात दोन लोकसभा निवडणुका आणि इतर अनेक छोट्या-मोठ्या निवडणुका झाल्या. या सर्व निवडणुका नक्षलवाद्यांच्या हिंसेच्या आणि बहिष्कारच्या आव्हानाला न जुमानता जोशात आणि शांततेत पार पडल्या. शिवाय पुढील जवळपास चार-पाच वर्षे त्या भागातून नक्षल चळवळीत भरतीही झाली नाही. नक्षलभागात काम करणारे अधिकारी, अंमलदार तणावाखाली असतात . त्यामुळे पोलीस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी उपाययोजना राबवणे हा नेहमीच त्यांच्यासाठी जिव्हाळ्याचा आणि कामाचाही महत्त्वाचा भाग राहिला होता. भंडारा पोलीस दलातही पोलीस कल्याणाचे अनेक उपक्रम त्यांनी राबवले. त्यात फक्त जिल्हा पोलीस मुख्यालयातल्या कर्मचाऱ्यांचाच नव्हे; तर प्रत्येक पोलीस स्टेशनचा विचार केला गेला. त्या अंतर्गत प्रामुख्याने बंदोबस्ताच्या कर्मचाऱ्यांसाठी विश्रामगृह, पोलीस वसाहतीत अभ्यासिका, पोलीस स्टेशनमध्ये लहान मुलांसाठी बगीचे, भंडारा पोलीस मुख्यालयात एक क्रीडा संकुल उभारणं असे उपक्रम त्यांनी राबवले. ' चैतन्य ' नावाची एक चांगली वास्तू उभी केली. तिथे व्यायाम शाळा, वाचनालय, विश्रामगृह बांधल गेल. ही वास्तू उभारण्यात सुनील मेंढे यांचा मोठा वाटा होता. तर त्यावरील म्युरल बनवण्यात चित्रकार एन. सी. नाथ यांचा मुख्य सहभाग होता. अरविंद इनामदार या वास्तूचं आणि खुल्या प्रेक्षकागृहाचे उद्घाटन करायला आले. तेव्हा त्यांनी जिल्हा पोलीस दलाची पाठ थोपटली हे उपक्रम राबवत असताना आणि ते पूर्णत्वाला गेल्यावर त्यांना अगदीच मनातून समाधान मिळालं.

**व्यसमुक्ती शिबिर**

पोलीस दलातील सुरुवातीच्या काळात त्यांच्या असं लक्षात आलं की, पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये दारूच्या व्यसनाधीनतेचे प्रमाण चिंताजनक आहे. कर्मचारी दारूच्या नशेत कामावर येतात. तेव्हा त्यांच्याकडून कामातल्या गंभीर चुका होतात. त्याने पोलीस दलाची विश्वसनीयता आणि जनमानसातली प्रतिमा खालावते. दारूच्या नशेत केलेल्या गैरप्रकाराबद्दल त्यांची विभागीय चौकशी झाली आणि त्यात अपराधी सिद्ध झाला. तर कठोर शिक्षा करण्यापासून इतर कुठलाही पर्याय नसतो. अशा वेळी ते कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय माणुसकीची, पोटावर न मारता पाठीवर मारण्याची अपेक्षा करतात; पण ते प्रशासकीय शिस्तीच्या चौकटीत शक्य होत नाही. या सगळ्यांची जाणीव असल्याने भंडारा जिल्ह्यात रुजू होताच. त्यांनी एक विस्तृत पाहणी केली. व्यसनाधीन अंमलदाराची यादी गोपनीयरित्या संकलित केली. तो आकडा जवळजवळ १८०० जणांच्या दलात साधारण ८० च्या आसपासचा होता. हे ते अधिकारी कर्मचारी होते , त्यांनी नशेच्या अंमलात कधी ना कधी गैरप्रकार केले होते. मग सदानंद दाते यांनी, त्या सर्वांच्या सेवापुस्तकांचा आणि वार्षिक गोपनीय अभिलेखांचा अभ्यास केला. त्यामधून ६५ च्या आसपास कर्मचारी असे निघाले की, ज्यांच्या खात्यात बक्षीशापेक्षा शिक्षा जास्त होत्या. आणि जे तीन पेक्षा जास्त वेळा कामावर अनधिकृतरित्या आणि दीर्घकाळ गैरहजर राहिले होते. जिल्हा विशेष शाखेमार्फत त्यांनी या यादीची पुन्हा एकदा शहानिशा केली. हे अंमलदार व्यसनाधीन आहेत. याची खात्री पटल्यावर त्यांनी कामाचा पहिला भाग पूर्ण झाला. हे करत असतानाच सदानंद दाते यांनी डॉ. अभय बंग आणि हेमंत करकरे यांच्या संपर्कात होते . करकरे साहेब तेव्हा मुंबई शहर पोलीस दलाच्या अमली पदार्थविरोधी शाखेत पोलीस उपायुक्त होते. त्यापूर्वी त्यांनी चंद्रपूर येथे पोलीस अधीक्षक म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्यांच्याबरोबरच्या चर्चेचा सदानंद दाते यांना अनेक प्रकारे उपयोग होत असे. त्यातूनच त्यांच्या व्यसनमुक्तींच्या कामाची डी ॲक्शन प्रोग्राम ची माहिती त्यांना झाली. तशाच प्रकारचा कार्यक्रम भंडारा पोलिसांसाठी सदानंद दाते यांनी राबवीला.

**धारावी**

आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असा तेव्हा धारावीचा नावलौकिक होता आणि आजही आहे. धारावीत होणारे गुन्हे कायदा व सुव्यवस्थेचे प्रसंग, निवडणुका, सण, उत्सव, मिरवणुका रात्रग्रस्त, नित्य क्रमाने भाग असलेली पोलीस स्टेशन आणि पोलीस चौकीची निरीक्षण फेरी यातून दाते यांना धारावी उमगत गेली. धारावी आणि आसपासच्या परिसरात असलेल्या झोपड्या, तेथील दाटीवाटीची लोक वस्ती, नागरी सुविधांचा अभाव, स्वच्छतेचा अभाव ,व्यसनाधीनता, वीज चोरी, जुगार, दारू,अश्लील सिनेमे इत्यादींचा अवैध्य व्यवसाय याच्या बरोबरीनेच तेथील लोकांची एकमेकांना धरून राहण्याची वृत्ती, सेवाभावी संस्थामार्फत चालणारे लोकप्रयोगी प्रकल्प, आसपासच्या वातावरणात प्रतिकूल परिणाम न होऊ देता, शिकणारी मुलं. हे सार अगदी जवळून बघायला मिळालं. त्यांच्या मनावर विशेष करून ठसली ठसली ती अव्यवाहातपणे काम करणारी कष्टकरी वर्गाची क्षमता आणि आसपासच्या विपरीत परिस्थितीतही जोपासलेला आशावाद. धारावीत चामड्याच्या वस्तू आणि तयार कापडाचं उत्पादन करून परदेशी निर्यात करण्याचे अत्यंत भरभराटीला आलेले व्यवसाय आहे. धारावीत जाईपर्यंत त्यांना त्याबद्दल जराही कल्पना नव्हती. छोट्याशा झोपडीत खाली कामाने वर स्वयंपाक करून आळीपाळीने झोपणे आणि त्याकाळी महिन्याला साधारणपणे दोन हजार रुपयाची कमाई करून, त्यातून तीनशे चारशे रुपये गावाकडे पाठवणारे लोक पाहून दाते चाटस पडले. एका प्रख्यात ब्रँडची जीन्स पॅन्ट, त्यावेळी बाजारात १७५ ते २०० रुपयाच्या आसपास मिळत असे; पण धारावीत त्याचे उत्पादन करणारा व्यावसायिक सर्व उत्पादन खर्चासह ती कंपनीला १३५ रुपयांना पुरवत असे. त्यामध्ये कपडा कापणं, शिलाई ,काज, बटन इत्यादी सगळं काम असे. असे काम असेंबली लाईन प्रमाणे झोपड्यांमध्ये चालत असे. १३५ रुपयेमध्ये मजुरीचा भाग २० रुपयाच्या आसपास होता. शिलाई काम करणारे रोज साधारणता ६०

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

ते ८० रुपये मिळवत असत. आणि लंगर मध्ये जिथे मजूरच आळीपाळीने स्वयंपाक करत. महिन्याला साधारण ६०० ते ७०० रुपयांमध्ये दोन वेळचे जेवण आणि चहा खर्च भागवत असत. सदानंद दाते यांनी कॉस्ट अकाउंटिंगचा अभ्यास केलेला असल्याने त्यांना या सगळ्या माहितीची विशेष नवलाई होती. त्यांना आठवतं की, १३५ रुपयांना जीन्स पॅन्ट पुरवणाऱ्या उत्पादकाला त्यांनी विचारलं होतं की, तो या कामाचा भाव थोडा तरी वाढवून का मागत नाही. यावर त्याने उत्तर दिलं होतं, " सर बांगलादेशात हीच पॅन्ट साधारणपणे १२५ ते १३० रुपयांमध्ये पुरवतात. मी जास्त पैसे मागितले तर मला काम मिळेल याची खात्री वाटत नाही ". आंतरराष्ट्रीय व्यापार उद्दीम, त्यातून निर्माण झालेली स्पर्धा, जागतिक दर्जाची उत्पादन क्षमता असलेले झोपडपट्टीतील उद्योग. व्यापारातील स्पर्धेत टिकून राहण्याची त्यांची उमेद या सगळयातून निर्माण होणारा रोजगार. तो मिळवण्यासाठी भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले कष्टकरी आणि त्यांना झोपडपट्टीत का होईना सामावून घेणारी मुंबई. हे दातेसाठी सगळं वास्तव जवळून अनुभवणं, समजावून घेणं,पोलीस अधिकारी म्हणून तेथील कायदा सुव्यवस्था चांगली राखणं आणि त्याद्वारे तिथल्या लोकांच्या आयुष्यात थोडंसं स्थैर्य निर्माण करणं ही एक मोठी संधी होती.

**एकता नगर**

धारावीच्या उत्तर टोकाला माहीम कुर्ला रस्ता आहे. त्या रस्त्यावरून ती जंक्शनला डावीकडे वळून ते बांद्राच्या त्यांच्या कार्यालयात जात असे. त्या रस्त्याच्या डाव्या बाजूला माहीमच्या खाडीत तीवराच छान जंगल होतं. एके दिवशी तिथून जाताना त्यांना दिसले की, काही माणसं तीवराची झाड तोडत होती. त्यांनी स्थानिक पोलिसांना बोलवल्यावर ती पळून गेली आणि दुसऱ्या दिवशी तिथे सात- आठ नवीन झोपड्या झालेल्या दिसल्या.

तिथल्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी त्याकडे लक्ष पुरवायला सांगितलं. एकतर पर्यावरणाच्या दृष्टीने तीवरांच्या जंगलाचे विशेष महत्त्व आहे. शिवाय जुन्या झोपड्या तोडताना होणारे गंभीर प्रश्न लक्षात घेऊन नवीन झोपड्या उभ्या राहू नये. असे शासनाचे स्पष्ट आदेश होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी त्यांना सांगितलं की, बनलेल्या झोपड्या काढणे ही जबाबदारी पोलीस विभागाची नाही . कायद्याने पोलिसांना या झोपड्या काढण्याचा अधिकारही नाही. त्याचा कल टोलवाटोलवी करण्याकडे असला तरी कायद्याच्या तरतुदी प्रमाणे झोपड्या हटवण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती. हे खरंच होतं. मग दाते यांनी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करायला सुरुवात केली. यादरम्यान ते रोजच त्या जागी पाच-दहा नवीन झोपड्या बनताना पाहत होते. महानगरपालिकेतून माहिती कळाली की, ही जमीन शासकीय आहे. त्यामुळे तेथील झोपड्या हटवणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित येते. मग पत्र ,फोन, स्मरणपत्र, अर्ध शासकीय पत्र अशा मार्गाने जवळ जवळ महिनाभर दाते हे पाठपुरावा करत राहिले. त्यादरम्यान दाते रोज तिथे नवीन झोपड्या उगवलेल्या पहात होते. एके दिवशी तिथे एक पाटीही उगवली होती. एकता नगर साधारण महिनाभरानंतर अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी हे अतिक्रमण हटवण्याची कारवाई करण्याचा ठरवलं. तेव्हा तिथे 200 च्या आसपास झोपड्या बनल्या होत्या. अतिक्रमण हटवणे हे एक किचकट धोकादायक, त्रासदायक काम असतं. विशेषतः मुंबईत अनेकदा अतिक्रमण हटवताना दगडफेक जाडपोळ होते. ते काम अर्ध्यावरच थांबतं आणि दुसऱ्या दिवशीपासून अतिक्रमण पुन्हा सुरू होतात. ते होऊ नये म्हणून एकता नगर बसवण्यात गुंतलेल्या झोपडपट्टी दादांवर त्यांनी आदल्या दिवशी गुन्हे दाखल केले. त्या रात्री त्या झोपडपट्टीतून रॉकेलचे साठे जप्त केले. वीज जोडण्या तोडल्या. दुसऱ्या दिवशी पहाटेपासून पोलीस विभागाने ,राज्य राखीव पोलीस दलाने अश्रुधूर पथक वगैरे सगळा बंदोबस्त ठेवून, त्या झोपड्या हटवण्याचे काम सुरू केलं. कामावर देखरेख ठेवायची म्हणून दाते कार्यालयातून जंक्शन मार्गे एकता नगरपाशी गेले तर सगळीकडे कोल्हाहल चालू होता. रडण्याचे, भांडण्याचे आवाज येत होते. एका ठिकाणी एक महिला मोठमोठ्याने पोलीस आणि अतिक्रमण हटवणाऱ्या अधिकाऱ्यांशी भांडत होती. थोडक्यात तिचं म्हणणं असं होतं की, तिथल्या गरीब झोपडपट्टी धारकांकडून हप्ते वसुली करणाऱ्या अधिकाऱ्याने अशी कारवाई करणं शोभतं का? एका ठिकाणी घर हटवली होती; पण अधिकारी देवळावर प्रहार कशी चालवायची या विवंचनेत होते. अशा अनेक गोष्टी मार्गी लागत. साधारण अर्ध्या तासाची पाहणी आटपुन दाते माहीम कुर्ला रस्त्यावर आले आणि जागच्या जागी ठिजून गेले. अजूनही ते दृश्य त्यांच्या डोळ्यासमोर तरळत होते. रस्त्याच्या एका बाजूला पोलिसांच्या वाहनाची भली मोठी रांग होती . शेजारीच पोलीस हेल्मेट घालून ,लाठी घेऊन उभे होते. राज्य राखीव पोलीस दलाच्या अधिकारी आणि जवानाकडे हत्यारे ,बंदूका ही होत्या. समोर ट्रक, बस ,टॅक्सी इत्यादी वाहनांनी गजबजलेला रस्ता होता आणि रस्त्याच्या मध्यभागी पाठमोरी तीन मुलं रडत उभी होती. त्यातली सगळयात मोठी मुलगी साधारणतः सात - आठ वर्षाची असेल. तिचं बोट धरून उभा ४-५ वर्षाचा मुलगा आणि तिच्या कडेवर एक लहान मुल. त्याचं घर त्या दिवशी तुटलं असणार. सशस्त्र पोलिसांच्या साक्षीने आणि पुढाकाराने त्यांचे अश्रू पुसायला या महानगरातल्या गाडीवाल्यांकडे कुठे वेळ होता. त्यांच्या व्यथा समजून घेऊन दीर्घकालीन उत्तर शोधून काढायची यंत्रणा भारताच्या या आर्थिक राजधानीकडे कुठे होती? त्या मुलांना समाजाच्या प्रगतीत सुख-समृद्धीत स्थान नसेल तर कायदा सुव्यवस्थेची शांततेची चाळ त्यांना असावी? का असावी?

समारोप

पोलीसातली नोकरी म्हणजे माणसाला मुळापासून हलवून टाकणारा अनुभव. कायद्याची अंमलबजावणी करत असताना अनेकदा पोलिस अधिकाऱ्यांच्या मनाची कुतरओढ होते, कायद्यातल्या पळवाटांमुळे 'नाही रे 'वर्गावर अन्याय होत असल्याचं बघावं लागतं. ना ही कुतरओढ व्यक्त करता येते, ना फरफट. अर्थात कधी कधी निखळ समाधानाचे क्षणही वाटायला येतात. वर्दीच्या आतला माणूस हे सारं कसं पचवतो. तीस वर्षाच्या पोलिसीसेवेतील अनुभवांबाबत, व्यवस्थेबद्दल, समाजातल्या भल्या- बुऱ्या प्रवृत्ती बाबत जेष्ठ पोलीस अधिकारी सदानंद दाते यांनी त्यांच्या वर्दीतल्या माणसाच्या नोंदी या स्वकथनामध्ये चिंतन केलेले आहे. या स्वकथनामध्ये डॉ. सदानंद दाते यांनी त्यांच्या वाट्याला आलेल्या पोलीस विभागातील अनुभवांचं चित्रण केलेल आहे आणि हे चित्रण जवळजवळ सजीव

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

,असं , वास्तविक असे चित्रण आहे. पोलीस खात्यामध्ये नोकरी करताना राजकारणाचा दबाव, राजकारणी लोकांचा हस्तक्षेप कसा होतो या सगळयांचं वर्णन त्यांनी यामध्ये केलेले आहे. सदानंद दाते हे एक कर्तव्य कठोर, प्रामाणिक अधिकारी म्हणून त्यांची एक आगळीवेगळी ओळख आहे. त्यांच्या वर्दीतल्या माणसाच्या नोंदी या स्वकथनामध्ये त्यांनी त्यांची ज्या- ज्या ठिकाणी पोस्टिंग झाली. त्या -त्या ठिकाणचं मग ते वर्धा ,भंडारा, साकोली, चिपळूण, पुणे,अमरावती, मुंबई सामाजिक वर्णन, व्यक्ती चित्रण सुद्धा रेखाटलेले आहे. त्यांचा हा जीवन प्रवास अतिशय खडतड आणि वेगवेगळया वळणातून पूर्ण झालेला आहे. असे हे डॉक्टर सदानंद दाते नावांचं आगळवेगळ, अष्टपैलू व्यक्तिमत्व आपल्याला त्यांच्या स्वकथनातून वास्तविकरीत्या पाहायला मिळते. त्याचप्रमाणे त्या खाकी वर्दीच्या मागे दडलेलं एक संवेदनशील मन सुद्धा या स्वकथनातून आपल्याला प्रगट होते.

**निष्कर्ष :-**

1. डॉ .सदानंद दाते हे ऑक्टोंबर 1993 मध्ये सहाय्यक पोलीस अधीक्षक म्हणून पोलीस खात्यात रुजू झाले.
2. डॉ.सदानंद दाते यांना चिपळूण येथे पहिली पोस्टिंग मिळाली.
3. डॉ. सदानंद दाते यांनी महाराष्ट्रातील दारूबंदी असलेला जिल्हा वर्धा येथे काम केले आहे.
4. डॉ. सदानंद दाते यांनी राज्य राखीव पोलीसच्या तुकडी करिता मगरडोह येथे निवाऱ्याची पक्की व्यवस्था केली.
5. डॉ. सदानंद दाते यांनी भंडारा येथे पोलीस वसाहतीमध्ये अनेक कल्याणकारी उपक्रम राबविले आहे .
6. डॉ.सदानंद दाते यांनी डॉ. अभय बंग आणि हेमंत करकरे यांचे सहकार्याने पोलीस अंमलदारांना व्यसनमुक्तीसाठी शिबिर सुरू करून त्यांना व्यसनमुक्त केले.

**संदर्भ :-**

1. #ABPMajha#MarathiNews 19 dec 2021
2. WWW.ibnlokmat.tv 16 oct 2012
3. मराठी मिरर यांचे समीक्षण: संदर्भ: मराठी मिरर वेबसाइटवरील पुस्तक समीक्षा (9 एप्रिल 2022)
4. डॉ. अभय बंग, डॉ. मीरा चड्ढा-बोरवणकर, मराठी मिरर, वाचन संकल्प महाराष्ट्राचा, सुवर्णमाध्य, आणि YouTube
5. YouTube वरील समीक्षा:संदर्भ: 'वर्दीतल्या माणसाच्या नोंदी' या पुस्तकावरील YouTube वरील एक समीक्षा
6. वाचन संकल्प महाराष्ट्राचा (जयकर ज्ञानस्रोत केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)
7. सुवर्णमाध्य ब्लॉगवरील समीक्षा.
8. दाते डॉ. सदानंद 'वर्दीतल्या माणसाच्या नोंदी' समकालीन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
9. दुसार डॉ. रोहिदास सेंट्रल पोलीस ट्रेनिंग स्कूल अर्थात महाराष्ट्र पोलीस अकादमीचा ईतीहास,संवेदना प्रकाशन ,पुणे .
10. कदम डॉ. ज्योती ब्रिटिशकालीन भारतीय पोलीस व्यवस्थेचा प्रारंभ, सर्वोदय प्रकाशन, नांदेड
11. पाटील डॉ. आनंद स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ, सदाशिव पेठ, पुणे
12. लोकराज्य मासिक, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई
13. दक्षता मासिक मुंबई